# तडजोड

अपूर्वाने वाजत असणारा फोन उचलला . हाय आपु लिझ हियर ,आय ॲम सेंडिंग क्रेग ओव्हर. कॅन आय बॉर्रो कप ऑफ ऑईल. गेल्या दहा वर्षात अपूर्वाला ह्याची सवय झाली होती. महिन्या अखेरीस लिझ काहीतरी मागणारच. कधी धुणाच्या साबण,कधी तेल,कधी दूध ,ब्रेड .पण गेल्या तीन चार वर्षात वस्तू मागण्याच प्रमाण खूप कमी झालं होत. दोघींची घर समोरा समोर. पहिल्या वेळेस जेव्हा लिझने धुण्याच्या साबणाची पावडर मागितली तेव्हा अपूर्वाला खूप आश्चार्य वाटलं होतं .कॅनडा सारख्या समृध्द देशात मध्यमवर्गीय लोकांना छान राहता येत. लिझ इगल रिज हॉस्पिटलमध्ये अकाउंटिंग डिपार्टमेंटमध्ये काम करायची व तिचा नवरा बिल पोलीस खात्यात होता. दोघांचा पगार ही चांगला होता. अपूर्वाला वाटलं ह्या महिन्यात एखाद्या वेळेस पावडर सपंली असेल पण तस मागणं दर महिन्यांचं झालं. बॉर्रो केलेल्या सर्व गोष्टी पुढच्या महिन्यातील पाच तारखेच्या आत लिझ परत पण करत असे.

जेव्हा अपूर्वा आणि तिचा नवरा अनिल मुलानं सह नवीन घरात राहावयास आले तेव्हा लिझने येऊन स्वतःची ओळख करून दिली होती. हसऱ्या डोळ्यांची लिझ अपूर्वाला एकदम आवडली. अपूर्वाचा मुलगा तनय तेव्हा तीन वर्षाचा आणि मुलगी सायरा वर्षाची होती. लिझला मोठा मुलगा क्रेग साडेतीनचा व मुलगी एरिन वर्षांची . बिलची पर्सन्यालीटी इझी गोयिंग असल्याने शिष्ट असणाऱ्या अनिलच पण त्याच्याशी बऱ्यापैकी जमत असे. मुलानंमुळे येण जाण वाढलं आणि लिझ अपूर्वाची मैत्री जमून गेली. अनिल आणि अपूर्वा दोघे

सॉफ्टवेअर इंजिनीयर्स . अनिल ओरॅकल मध्ये आणि अपूर्वा बँक ऑफ नोव्हा स्कॉटीयाच्या आयटी सेकशन मध्ये कामाला होती . दोघांचे पगार चांगले होते. मैत्री झाल्यावर चार महिन्यांनी लिझ जेव्हा महिनाखेरीस काहीतरी मागावयास आली तेव्हा अपूर्वा तिला गमतीने म्हणाली “लिझ, एव्हरी मन्थ ,हाऊ कम यु आर आंल्वेज शॉर्ट ऑफ थिंग्जस ?” तेव्हा लिझ तिला म्हणाली बिलने तिला महिन्याचं बजेट आखून दिल होत .त्याच्यातच तिला महिन्याचा खर्च भागवावा लागत असे. घरात येणं जाण सतत असल्याने तिला कितीही काटकसर करून महिन्याअखेरीस काही तरी कमी पडत असे व पैसे असूनही बिल वस्तू आणायला पैसे देत नसे. अपूर्वाला त्याच्यात काही वेगळं वाटलं नाही. तिच्या आईवडीलाचा संसारात डॅड सगळा पगार आईकडे देत असत नि त्याच्यात आई महिन्याचं भागवत असे. आई नेहमी म्हणायची संसारात एकाने पैश्याच नीट सांभाळ कि झालं.एका महिन्यात ख्रर्च जास्त झाला तर दुसऱ्या महिन्यात जास्त काटकसर कराची. पण हे डाळ ,तेल वगैरे कोणी कोणाकडे मागीतल्याच तिला आठवत नव्हतं. आईडॅडीच्या स्वतःच्या दोन बेडरूमच्या ब्लॉक मध्ये अपूर्वा वाढलेली. आई,डॅडी,मोठ्ठी बहीण रश्मी व अपूर्वा ,घरात चार जण .घरची परिस्थिति बेतासबातच. नशीब डॅडला जेव्हा त्यांच्या वडलांच्या प्रॉपर्टीचे बऱ्यापैकी पैसे मिळाले तेव्हा आईने त्या पैशात डॅडीला ब्लॉक घ्यायला भाग पाडलं होत.त्यामुळे निदान आता त्याच्याकडे हक्काच घर तरी आहे. का कोण जाणे डॅडींची नोकरी एके ठिकाणी कधी नीट टिकलीच नाही. किती आईनी कष्ट करून दोघी मुलीना शिकवून मोठ्ठ केलं होत. ते सगळं आठवून अपूर्वा आता सुध्दा बैचैन झाली .
स्वयंपाकघरात गेली एकाच्या ऐवजी दोन कप तेल बाटलीत घालून ती बाटली तिने तयार करून ठेवली. एकीकडे घरातील काम करत असताना आज अपूर्वाच्या डोक्यात लिझ आणि बिलचे विचार येत राहिले. थँक्सगिविंग बारबेक्यू ,क्सिसमस,वाढदिवस असं अनेकदा ते एकमेकानकडे जेवायला जात

येत असत. लिझचे आणि बिलचे दोघांचे आईवडील विंनीपेगमध्ये, लिझची बहीण आणि तिची फॅमिली टोरोन्टोत असत. अपूर्वा -अनिलची फॅमिली पुण्यात असल्याचं कळल्यावर लिझ म्हणाली “आता आपणच एकमेकांची फॅमिली ”.
गेल्या दहा वर्षात जेव्हा जेव्हा अपूर्वा -अनिल क्सिसमसच्या सुमारास गावात होते ,तेव्हा प्रत्येक क्सिसमस डे ला लिझ त्यांना बोलवत असे. बिल कितीही वागायला छान असला तरी ,आपण बायकोला कस महिन्याचं बजेट आखून दिल आहे व काही झालं तरी तिला त्याच्यापेक्षा वरती पैसे न देता तिला तेवढयात कस अडजेस्ट करायला शिकवतो आहे , ह्याचा त्याला गर्व होता. तो तसलं काही बोलायला लागला कि लिझला ओशाळयागत होत असे. लिझ अपूर्वकडे नेहमी तक्रार करत असे कि काही वेळेस पाहूणे जास्त आले कि सगळा खर्च वाढतो ,मूल मोठी होत आहेत ,त्यांचं खाणं वाढतंय ,एक ना अनेक गोष्टी . तिचा पण हातभार होताच कि घरखर्चत . ऐकणाऱ्यास वाटावं जस काही सगळं बिलच करतो आहे. बायकोला एका प्रकारच्या कंट्रोलमध्ये अथवा ताब्यात ठेवणच होत ते .
तिच्या डोळ्या समोर शरयूताई आल्या.
अपूर्वा-अनिल वॅनकूवरला पाहिलांदा आले तेव्हा इंडियन ग्रोसरी स्टोअरमध्ये शरयूताईची ओळख झाली. शरयूताई खरं तर आईच्या वयाच्या . त्यांनी अपूर्वाला भाचीच मानली होती. शरयूताईच सगळं आयुष्य वॅनकूवरमध्ये गेलं .वॅनकूवरला येऊन ३८ ते ४० वर्ष झाली होती पण इतर मराठी व कॅनेडियन लोकांशी फारसे संबंध नसल्याचे शरयूताईच्या बोलण्यातून कळल. घरी जाणयेणं वाढल्यावर त्याच्या नवऱ्याच  सुधीरकाकाच चमत्कारी वागण लक्षात आलं . सुधीरकाकांना आपली बायको कुठे जाते, कोणाशी बोलली , घरी काय केलं ,कामावर काय झालं,सगळं तपशीलवार माहिती लागायाची. शरयूमावशी कोणाबरोबर हसत खेळत वागल्या व कोणी त्यांना चांगलं म्हटलं कि काकांनी रागराग केलाच . चांगलं मजेत चालेल वातावरण बिघडून जायचं. हे स्वतः अपूर्वानेही बघितलं होत.

एकदा मन मोकळ्या बोलत असताना शरयूताई म्हणाल्या " अग पहिले आम्हाला बरेच मित्र मैत्रिणी होत्या ,पण सुधीर सगळ्यांच्यात काही ना काही खोड्या काढायचा. आपलं मत ते कस बरोबर आहे ह्यावर मोठमोठ्याने वाद घालत बसायच ,कस जमणार इतरांशी. लोकांसमोर माझाच अपमान व्हायचा ,त्यात ना आनंद आम्ह्मला व येणाऱ्या लोकांना.आता मीच नाही मैत्रीबित्री करण्याच्या भानगडीत पडत.लग्न झाल्यापासून मी माझं स्वातंत्र गमावून बसले . आधी माहेरची नि आता मूल पण म्हणतां बाबानं पासून वेगळी रहा. इतकी वर्ष झाली ,हत्ती गेला नि शेपूट राहिली . कंपनीच पेन्शन असताना पण मी पार्टटाइम नोकरी करते. तेव्हढाच वेळ जातो नि कटकटी कमी ”.

दिसत तस नसत हे म्हणतात ते काही खोट नाही.

लिंडा - दुसरं टोक . तिच्याशी ओळख झाली ती मुलांच्या सॉकर प्रॅक्टिसमूळे. लिंडाचा मुलगा ॲलन व अपुर्वाचा तनय एका टीममध्ये . कारपूल, मुलांचे वाढदिवस ,शाळेचे प्रोग्रॅम्स ह्यामूळे ओळख वाढत गेली. लिंडा अतिशय सोसल पण तितकीच बॉसी. तिला वाटायचं आपल्याशिवाय जग चालणार नाही. नवरा मायकल ताटाखालचं मांजर .बायको काय म्हणेल ते होणार . प्रत्येक गोष्ट आपण कशी चांगली करू शकतो हे सांगत बसे. ती कुढल्याही प्रोग्रॅम अथवा मिटींगला असली कि इतरांना बोलायला संधीच मिळत नसे. आय टोल्ड मायकल थिस अँड द्याट .

आईच तरी काय ? आई पण खरी बी.ए झालेली पण नोकरी करण्याबाबत डॅडचा फालतू अभिमान तेव्हा आड आला . आमच्या भावे घराण्यात अजून बायकांनी कधी नोकरी केलेली नाही. तू पण करायांची नाही ,मला काय तुम्हाला पोसता येत नाही. डॅडची नोकरी गेली कि आईचे अजून हाल व्हायचे. कधी ऑफीसच्या लोकांसाठी जेवणाचे डबे करून दे ,कधी पापड,पापड्या करून दे. पुरणपोळ्या, चकल्या जी ऑर्डर यायची ते करून देत असे. माझं नि रश्मीचं शिक्षण पूर्ण

झालंच पाहिजे म्हणून. पुरणपोळी आणि खायचे डबे केलेले चालत होते डॅडीना. सगळ्यांना माहित होत परिस्तिथी सो सो आहे ते.आई खरी खमकी पण नोकरी करण्या बाबत डॅडीच तिने का ऐकलं माहित नाही. मनात असून चाललं नसावं. नंतर पच्छाताप करत बसली.

तेव्हाच अपूर्वाने ठरवल होत कि डिग्री घेऊन नोकरी मिळाली कि आई-डॅडना दर महिना पैसे द्यायचे व त्यांची चांगली काळजी घ्यायची. दोघी बहिणींच त्याबाबतीत एक मत झालं कि लग्न झाल्यावर सुध्दा आईवडिलांना दर महिन्याला ठराविक रक्कम घरखर्चाला द्यायची .मोठी बहीण रश्मी स्कॉलरशिपवर सॉफ्टवेअर इंजिनीरिंगमध्ये मास्टर्स करायला सॅन फ्रांसिस्कोला आली. तिथे तिला अविनाश भेटला व दोघ लग्न करून तेथेच स्थाईक झाले. रश्मीची नोकरी सुरु झाल्यापासून ती दर महिन्यास आई-डॅडीना पैसे पाठवत आली आहे . लग्नापूर्वी तिने अविनाशला सागिंतल होत कि मी आईवडिलांना दर महिना पैसे देणार. अविनाश म्हणाला " तुझे आईवडील, तू त्यांचं करालाच पाहिजे . मुलाने आईवडिलांकडे बघायचं हि जुनी पद्धत. ज्यांना मुलीच आहेत त्याच्या पालकांनी काय करायचं ?". डॉक्टर असलेला अविनाश एकदम वागायला मोकळा व छान. घरच्या सगळ्यांना त्याने आपलस करून घेतलं होत.

जेव्हा अनिल रानडेच स्थळ अपूर्वाला सांगून आलं ,पसंती झाली तेव्हा लग्न ठरवण्यापूर्वी अनिल व अपूर्वा एकमेकांना भेटत होते. पहिल्या भेटीच अपूर्वाने सागिंतल होत“ मी दर महिन्याला आईवडिलांना पैसे देणार, माझ्या पगारातून.” तेव्हा चटकन अनिल हो म्हणाल्याने अपूर्वाला आनंद झाला होता. अनिलकडे एकत्र कुटूंब होती. घरात त्याचे आईवडील,भाऊ व त्याची बायको. लग्ननंतर हनिमूनचे दिवस मजेत गेले. मग माहेरच आडनाव बदलून रानडे करून घेतल ,बँकेत दोघांच्या नावाने खात उघडल तेंव्हा अपूर्वाला अनिल म्हणाला तुझ्या कंपनीला तुझा पगार डिरेक्टली आपल्या दोघांच्या खात्यात टाकायला

सांग. एकमेकांचे जीवन साथी झाल्यावर अनिलने सांगितलं त्यात वावग काहीच नव्हतं. पगार दुसऱ्या महिन्यापासून दोघांच्या खात्यात जमा होऊ लागला. दुसऱ्या महिन्यात सगळे जेवायला बसले तेव्हा सासऱ्यांनी विचारलं " अनिल तुमच्या दोघांच्या खात्यातून सात हजाराचा चेक कोणाला दिला ?" अनिल म्हणाला " मी नाही लिहिला " सगळे अपूर्वाकडे बघायला लागल्यावर गोधलेल्या तिने चेक आईवडीना दिला असं सांगितलं. दर महिना त्या रकमेचा चेक आईकडे जाईल हे तिने म्हटल्यावर सगळ्याच्या कडून रागात " का ?,कशासाठी ? इतकी परिस्थिति का वाईट आहे त्यांची ?"प्रश्नांचा भडीमार झाला. “म्हणजे जन्मभर तू त्यांना पैसे देणार ? त्याचा काय संबंध तुझ्या पगारशी ? " तिच्यावर चाललेला भडीमार बघून  सुध्दा अनिल काहीच बोलत नव्हता. त्यावर अपुर्वा म्हणाली "मी अनिलला सांगितलं होत कि माझा पगार चांगला आहे आणि लग्न झाल्यावरही मी आईवडिलांना दर महिन्यास पैसे देणार आहे . रश्मी पण पाठवते अमेरिकेतून." सगळे तावातावाने बोलत होते. अनिल आम्हाला म्हणाला होता पण आम्ह्मला वाटलं कि लग्न होऊन तू घर सोडून नवऱ्याच्या घरी जाणार तेव्हा भावनेच्या भरात तू असं बोलली असणार. म्हणून आम्ही काही बोललो नाही. आमच्या घरात सर्व निर्णय आम्ही एकत्र घेतो. असलं काही चालणार नाही. अपूर्वाच्या तोंडावर आलं होत म्हणावं " अनिल कसा दर महिना तुम्हाला पंचवीस हजार रुपये देतो ,एका व्यक्तीचा खर्च इतका असतो का? पण ती गप्प बसली . " त्या संध्याकाळी तिने बाहेर जाऊन अनिलला खूप समजवून सांगण्याचा प्रयत्न केला. आईने कसे कष्ट करून आपणास शिकवलं म्हणून तर ती आज एवढा पगार मिळवू शकत होती . जरी थोडेफार पैसे बँकेत होते तरी एवढ्या महागाईत त्याच्या व्याजावर नीट जगणं शक्य नव्हतं ,पैसे न दिल्यास आईला पुन्हा कष्ट्याची काम करावी लागतील व डॅडीना ह्या वयात प्रकृतीच्या तक्रारीमुळे नोकरी करता येणार नव्हती. तिच्या पन्नास हजारातील सात दहा हजार दिल्याने त्याचंही  काही कमी होणार नव्हतं.

अनिल व त्याची फॅमिली तिची मत ऐकुन घ्यायला तयार नव्हती. अपूर्वाचा राग वाढत चालला होता अनिलचा नसमजूतदारपणा बघून . मी नोकरी करते ,मी पैसे मिळते ,लग्नापूर्वी सांगितलं होत ,अपूर्वाच्या अभिमानाला तडा जात होता . अपूर्वाचं घरी आल्यावरच रागरंग बघून आईने तिच्याकडून सगळी माहिती काढून घेतली. त्यावर आई व डॅडीना पहिले खूप राग आला. त्यांची पण ती मुलगीच होती ना ! तिने थोडे दिले पैसे तर काय कमी पडणार होत अनिलला ? सगळा थोडीच पगार देणार होती. ते दोघे म्हणाले "अग रश्मी पाठवतीय तेवढ्यात भागवू आम्ही " पण अपूर्वाला ते पटत नव्हतं .दर महिन्याला ह्यावरून अनिल व तिची भांडण होत असत. तिच्या प्रत्येक खर्च्यावर त्याच लक्ष असे. घरातले अजून कटकट करायला होतेच. प्रकरण अजून वाढायच्या आधी ओरॅकलने त्याची बदली वॅनकूवरला केल्याची बातमी मिळाली .

अपूर्वा-अनिल बर्नेबीत अपार्टमेंट मध्ये राहू लागले. अनिलला वॅनकूवरची एरिया नवीन नव्हती. कामासाठी म्हणून तो आधी बरेचदा कॅनडा ,अमेरिका युरोपमध्ये येऊन गेला होता. अपुर्वाला कॅनडाच पर्मनंट रेसिडेंट कार्ड मिळे पर्यंत नोकरी करता येणार नव्हती . त्यात दोन वर्ष गेली. त्या दोन वर्षात आईवडलांना पैसे पाठवायचा विषय तिने काढला नव्हता. अनिलच घरखर्चाच बघत असे. अपुर्वाला वाजवा खर्च करण्याची सवय पण नव्हती. रश्मी म्हणाली “तुला नोकरी लागे पर्यंत मी आई-डॅडला जास्त पैसे पाठवीन “ . अपुर्वाला चांगल्या पगाराची नोकरी सुरु झाल्यावर तिने अनिलला सांगितलं कि येत्या महिन्यापासून ती आई-डॅडला पैसे पाठवावयास सुरवात करणार आहे. अनिलने  स्पष्टच नाही म्हणाल. पुन्हा भांडण नि कटकटी सुरु झाल्या. पण अपूर्वा ऐकायला तयार नाही हे जाणवल्यावर अति कटकटी करून एक अमाऊंट ठरली . अनिल म्हणाला "मी पाठवत जाईन पैसे" . रश्मीसारखे पैसे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कधीच आई डॅडीच्या खात्यात जमा होत नाहीत . अनिल आधी करन्सी एक्सचेंज रेट बघणार नि पाठवणार.

चांगला रेट असला कि दोन महिन्याचे एकदम पाठवत असे . अपूर्वा त्याच्या इतर चांगल्या वागणुकी लक्ष्यात घेऊन काही बोलत नसे . निदान महिन्याचे पैसे आईडॅडला मिळता आहेत ना मग झालं.अनिलशिवाय शॉपिंग केल्याचं अपूर्वाला आठवत नाही. पै अन पै चा हिशोब अनिल मागत असतो .तिच्यावरचा अनिलचा पैशाबाबतीतला ताबा लिझ पेक्षा जास्त आहे. बिलने एकदा महिन्याचे पैसे दिले कि ती ते कसे खर्च करते ह्यात तो लक्ष घालत नसे. निदान तिला ते तरी स्वातंत्र होत. आयुष्य म्हणजे काय सारखी तडजोड शेवटी.

डोकं व मन शांत करण्यासाठी अपूर्वाने एक दीर्घ श्वास घेतला नि सोडला, तेवढ्यात तनयची हाक ऐकू आली ‘मॉम क्रेग इस वेटिंग “ अपूर्वाने पटकन स्वयंपाकघरातून बाटली आणून क्रेगला दिली.